सत्यमेव जयते

महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ ☎ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ☎ 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

ई-मेल - sec_mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in

# वरिष्ठ भूवैज्ञानिक, महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट-अ

## धारिका क्रमांक : १७७९(९)/ १६३/पीएच /पंधरा

## जाहिरात क्रमांक : १६८/२०११

आयोगातर्फे **महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या आस्थापनेवरील वरिष्ठ भूवैज्ञानिक, महाराष्ट्र भूजल सेवा, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, गट-अ या पदावरील नियुक्तीसाठी** चलनवलन विषयक विकालंगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू या अपंग वर्गवारीच्या **एका जागेसाठी ऑनलाईन** पध्दतीने **अर्ज** मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- १**

**अपंग** ( चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or cerebralpalsy) - १

**२.१ केंद्र शासनाने अपंगांसाठी विहित केलेल्या यादीतील अनु.क्र. ४४२ वरील (Sr) Geologist करीता** (१) श्रवणशक्तीतील दोष, **HH(Hearing Handicapped), आणि (२) OA, OL** (One Leg Affected / One Arm Affected) प्रवर्गाचे अपंगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.

**३. वेतनश्रेणी : पे बॅण्ड** रु. १५६००-३९१०० ग्रेड पे ५५००/-

**४. पात्रता-**

४.१ **वय- दिनांक १ एप्रिल, २०१२** रोजी ४५ वर्षे,

४.२ शासनसेवेतील उमेदवारांना उच्च वयोमर्यादा लागू नाही.

४.३ अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करण्या-या उमेदवारांना वयोमर्यादेत सूट देय.

५. **Qualifications** :- Candidate must Possess ....

५.१ Post-graduate degree in Geology or Applied Geology of a recognized University or the diploma in Geology or Applied Geology from the Indian School of Mines ,Dhanbad or any other recognized equivalent qualifications **AND THEREAFTER**

५.२ Have practical experience in hydrogeological work comprising of regional hydrogeological surveys in sedimentary,metamorphic and volcanic terrains,exploratory,drilling and testing of acquifers and problems related to well hydraulics , for a period of seven years (five years in case of candidates with a first class post-graduate degree or diploma )

Provided that preference may be given to those who in addition-

(i) have previous experience in a responsible capacity in any institution doing field work in hydrogeology and who have carried out or supervised independent field mapping prospecting and surveying ;or

(ii) have published papers in any branch of Geology or Applied Geology; or

(iii) have secured a Doctorate in Geology or Applied Geology with practical experience of hydrogeological field work

**५.३ परिविक्षा कालावधी- २ वर्ष**

६. **प्रस्तुत** जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या

मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल.

७. **कर्तव्ये व जबाबदा-या:-** प्रस्तुत पदाची कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**९. शुल्क :**

**९.१** अमागास - ₹ ४१०/- **९.२** मागासवर्गीय ₹ २१०/- /-

**९.३** सदर शुल्क ऑनलाईन अर्जाची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये चलनावर नमूद केलेल्या अंतिम दिनांकापूर्वी व बँकेच्या कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल.

९.४ आयोगाने विहित केलेल्या चलनाद्वारेच विहित कालावधीत बँकेमध्ये फक्त रोखीने परीक्षा शुल्क भरावे. नेटबँकिंग, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड इत्यादीसारख्या माध्यमाद्वारे शुल्क भरता येणार नाही.

**१०. अर्ज करण्याची पध्दत :-**

**१०.१** प्रस्तुत भरतीसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१०.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **आयोगाने विहित केलेल्या कालावधितच सादर करणे आवश्यक राहील.**

**१०.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**१०.४**विहित पद्धतीने **अर्ज सादर करुन बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर, दोन कार्यालयीन कामाकाजाच्या दिवसानंतर** (Working Days) **उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा** (Transaction ID Updated Successfully) **एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये** Application Status **द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.**

**१०.५ चलनाद्वारे शुल्क भरल्यानंतर बँकेकडून** Transaction ID **प्राप्त होईल. दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या** Tansaction ID **ची नोंद पुन्हा ऑनलाईन पद्धतीने अचूकरित्या करावी.** Tansaction ID **ची नोंद अचूकरित्या होत नसेल अथवा तांत्रिक अडचण उद्भवत असेल तर ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या** Feedback **द्वारे** Registration ID, Transaction ID **व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक आयोगास पाठवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या** Transaction ID **ची नोंद अचूकपणे झाली असल्याबाबत खात्री करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.**

११. **विहित पद्धतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २७ जानेवारी,२०१२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

१२. **चलनाद्वारे विहीत शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २८ जानेवारी, २०१२ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.**

**१३. महत्वाची सूचना: उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल याची कृपया नोंद घ्यावी.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २८ डिसेंबर,२०११**

**नि. श. पटवर्धन**
**उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**